महावितरण

# जाहीर निवेदन

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये एका वर्षा (२०२१-२०२२) करीता आय.टी.आय शिकाऊ उमेदवार म्हणुन भरती प्रक्रिया संबंधी महावितरण कार्यालय मंचर विभाग यांच्या अस्थापनेवरील वीजतंत्री/तारतंत्री या प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार पदाच्या एकुण ३७ जागा भरण्यासाठी एस.एस.सी. व आय.टी.आय.उत्तीर्ण (वीजतंत्री/तारतंत्री) NCVT अंतर्गत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे Designated Trade हा ELECTRICIAN/WIREMAN व Apprentices Training Period एका वर्षाकरीता असुन वीजतंत्री/तारतंत्री यांच्या ३७ जागा भरावयाच्या आहेत. मंचर विभागीय कार्यालयाचा आस्थापना नोंदणी क्र. E05202702197 असा आहे. १) शैक्षणिक अर्हता महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधुन वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (२) वयोमर्यादा सर्वसाधारण उमेदवारांसाठी ३० वर्ष, मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३५ वर्ष (३) प्रशिक्षण कालावधी १ वर्ष (४) विदयावेतन नियमाप्रमाणे (५) पद कमी जास्त करण्याच्या व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे. (६) सदर भरती हि फक्त मंचर विभागापुरती मर्यादित आहे. (७) एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व सदर प्रमाण पत्राची साक्षांकित प्रत (८) आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्र (चार सेमिस्टर गुणपत्रिका) (९) उमेदवारांने मागास प्रवर्गात अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्राची छायांकित प्रत (१०) भरती प्रक्रीयेदरम्यान उमेदवाराने राजकीय दबाव आणल्यास आपली उमेदवारी रदद समाण्यात येईल याची नोंद घ्यावी. (११) उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना त्यांच्या आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्रावरील एकुन चार सेमिस्टरचे एकत्रित गुण नोंदवीने आवश्यक आहे. (फक्त कोणत्याही एकाच सेमिस्टरचे गुण नोंदवल्यास त्या अर्जाचा विचार केला जानार नाही.) उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना (www.apprenticeshipindia.org) पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने दि. ०६.०१.२०२३ अखेर अपलोड करणे बंधनकारक आहे. वरील कालावधीत नंतर सादर केलेल्या ऑनलाईन (Online) अर्जाचा कोणाताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. गुणांच्या आधारे निवड झालेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांना अर्ज व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय म.रा.वि.वि.कं.मर्या., बाणखेले इमारत, दुसरा मजला, विकास थिएटर जवळ, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे स्वखर्चाने हजर राहनेचे आहे. अर्ज व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठीची तारीख व वेळ गुणवत्ताधारक उमेदवारांना त्यांचे ऑनलाईन (Online) अर्जामध्ये नमुद ईमेल द्वारा (Email) अवगत केली जाईल. शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड झाल्यानंतर काही कारणास्तव ॲप्रेन्टीस बोर्ड मुंबई यांच्याकडुन अर्जदाराची नोंदणी नाकारल्यास अशा शिकाऊ उमेदवाराची शिकाऊ उमेदवारी निवड आपोआप रदद होईल.

**PRO No.-PZ138/22** कार्यकारी अभियंता (प्र) मंचर विभाग